# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.08.2026** **वारःमंगळवार**

---

1. महाराष्ट्रातल्या विविध विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पंतप्रधान मोदींशी चर्चा
2. ब्रिक्स देशांच्या आय सी टी परिषदेला महाराष्ट्रात पुण्यात सुरुवात
3. झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा रद्द; मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची घोषणा
4. दिल्ली आणि महाराष्ट्रात मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील माहिती संकलनाचा टप्पा पूर्ण आणि
5. जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टी आणि पी. व्ही सिंधूचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**<u>देवेंद्र फडणवीस</u>**

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास आणि दळणवळण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन महत्वपूर्ण चर्चा केली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्यासमेवत झालेल्या बैठकीत मुंबई-वाढवण एक्स्प्रेस-वे कनेक्टिव्हिटी म्हणजेच उत्तन-विरार कॉरिडॉर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर मुख्यमंत्र्यांची प्राधान्यानं चर्चा झाली. सुमारे 55 हजार कोटींच्या या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीमार्फत वित्तीय सहाय्य मिळवण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारनं सादर केला आहे.

**<u>ब्रिक्स-पुणे</u>**

केंद्रीय दूरसंचार विभागातर्फे पुण्यात 'ब्रिक्स देशांच्या 'माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञान' अर्थात आय सी टी गटाच्या परिषदेचं आयोजन करण्यात आलं. दूरसंचार विभागाचे सचिव अमित अग्रवाल यांनी काल या परिषदेचं उद्घाटन केलं. 21 ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना, 'सक्षम भविष्यासाठी नावीन्य, सहकार्य आणि परिवर्तन' अशी आहे. या परिषदेत, सर्वसमावेशक, शाश्वत आणि सक्षम आयसीटी परिसंस्था विकसित करणं, तसंच विश्वासार्ह, सुरक्षित आणि मानवकेंद्रित डिजिटल वातावरण, डिजिटल कौशल्ये आणि क्षमता विकास यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर चर्चा अपेक्षित आहे.

**<u>झारखंड-आंदोलन</u>**

झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षांच्या उमेदवारांनी केलेल्या 24 दिवसांच्या आंदोलनानंतर, राज्य सरकारनं 2024 ची JSSC-CGL परीक्षा आणि TDPL एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या सर्व स्पर्धा परीक्षा रद्द केल्या आहेत. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी काल संध्याकाळी मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीनंतर या निर्णयाची घोषणा केली. तसंच 2014 पासून झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोग यांनी घेतलेल्या भरती परीक्षांची सखोल चौकशी करण्याचे आदेशही राज्य सरकारनं दिले आहेत. आंदोलकांच्या काही मागण्या अजूनही प्रलंबित आहेत, असं आंदोलक विद्यार्थी नेते पियुष कुमार यांनी सांगितलं आहे.

**<u>अर्थमंत्री</u>**

पायाभूत सुविधांची वेळेवर पूर्तता, भूखंड वाटप, गुंतवणूक आणि उत्पादन सुरू करण्यावर लक्ष केंद्रित करायला हवं, असं मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं आहे. त्या काल नवी दिल्लीत राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास आणि अंमलबजावणी ट्रस्टच्या सर्वोच्च देखरेख प्राधिकरणाच्या बैठकीत बोलत होत्या. यावेळी त्यांनी 'पीएम गतीशक्ती'च्या माध्यमातून एकात्मिक नियोजनाच्या आणि गुंतवणूकदार-स्नेही भूखंड वाटप यंत्रणांचा वापर करण्याच्या गरजेवर भर दिला.

**<u>लष्कर प्रमुख</u>**

लष्कर प्रमुख जनरल धीरज सेठ यांना नेपाळ लष्कराच्या 'मानद जनरल' या पदवीनं सन्मानित करण्यात आलं आहे. काठमांडू इथल्या एका विशेष समारंभात काल नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांच्या हस्ते हे मानद पद प्रदान करण्यात आलं. 1950 पासून चालत आलेल्या या परंपरेनुसार भारत आणि नेपाळ एकमेकांच्या लष्कर प्रमुखांना 'मानद जनरल' हा दर्जा प्रदान करतात.

**भाजपा-नवीन पदाधिकारी**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी काल पक्षाच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या नव्या चमूची घोषणा केली. वसुंधरा राजे सिंधिया, तीरथसिंह रावत, राम माधव, बैजयंत जय पांडा, सरदार मनप्रीतसिंग बादल आणि रेखा वर्मा यांच्यासह 13 राष्ट्रीय उपाध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे; तर विनोद तावडे, सुनील बन्सल, स्मृती इराणी आणि बिप्लब कुमार देब यांच्यासह आठ नेत्यांची राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**दिल्ली-मतदार यादी पुनरीक्षण**

दिल्लीत सुरू असलेल्या मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील माहिती संकलनाचा टप्पा काल पूर्ण झाला. दिल्लीत मुख्य निवडणूक आयोग कार्यालयानं दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीत 1 कोटी 45 लाख अर्ज वितरीत करण्यात आले होते. यासाठी 13 हजार बीएलओंनी काम केले तर 97 लाखांहून अधिक माहिती संकलन अर्जांचं डिजीटलायझेशन झालं आहे. 24 ऑगस्ट ते 23 सप्टेंबर या महिनाभराच्या कालावधीत हरकती दाखल करता येणार आहेत. तर अंतिम यादी 27 ऑक्टोबरला प्रसिद्ध होईल.

**महाराष्ट्र-पुनरीक्षण**

महाराष्ट्रात मतदार यादी सखोल पुनरीक्षण अर्थात SIR आणि सुधारणा प्रक्रियेतील गणना अर्ज जमा करण्याचा कालचा अखेरचा दिवस होता. प्रारूप मतदार यादी 24 ऑगस्टला प्रकाशित होणार असून, त्यावर 23 सप्टेंबरपर्यंत आक्षेप नोंदवता येणार आहेत. 22 ऑक्टोबर पर्यंत आक्षेप निकाली काढण्यात येऊन 27 ऑक्टोबरला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील 2 कोटी 7 लाख 93 हजार 916 मतदारांचे अर्ज अद्याप BLO कडे जमा झालेले नाहीत.

**ट्रम्प-निवडणूक प्रणाली**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या मतदार ओळखपत्र प्रणालीची प्रशंसा केली आहे. अमेरिकेतील निवडणूक नियम अधिक कडक करण्याच्या दृष्टीने ही प्रणाली आदर्श असल्याचं ते म्हणाले. अमेरिकेतील मतदारांच्या ओळखीबाबत अधिक कडक निकष असावेत या बाबत ट्रम्प यांची आग्रही भूमिका आहे.

**अमेरिका-इराण**

इराण सैन्याशी वाटाघाटी करण्यासाठी अमेरिकेकडे अनौपचारिक संपर्क मार्ग असल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांचा दावा इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स म्हणजेच आयआरजीसीने फेटाळून लावला आहे. हा दावा म्हणजे केवळ एक भ्रम आहे, असं आयआरजीसीचे प्रवक्ते हुसेन मोहेब्बी यांनी म्हटलं आहे. अमेरिका आणि आमच्यात कोणताही संवाद सुरू नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**वाणिज्य मंत्री**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत 'चेक पॉइंट सॉफ्टवेअर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी नदाव झाफ्रिर यांची भेट घेतली. या बैठकीत त्यांनी कंपनीचा देशातील वाढता सहभाग,संशोधन आणि विकास क्षेत्रातील विस्तार

तसंच डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणालीचा वापर याबाबत चर्चा केली.

**क्रिकेट**

श्रीलंकेतील गॉल इथं सुरू असलेल्या भारत आणि श्रीलंका संघादरम्यानच्या पहिल्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवसअखेर भारतानं काल पहिल्या डावात 462 धावा करत, 178 धावांची आघाडी घेतली आहे. भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट खेळी करत, श्रीलंकेचा पहिला डाव 284 धावांत गुंडाळला. पाऊस सुरू झाल्यामुळे भारताचा दूसरा डाव सुरू होऊ शकला नाही.

**बॅडमिंटन**

जागतिक बँडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीनं चीनच्या शी यू ची याचा 21-14, 13-21, 21-19 असा विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश निश्चित केला. तर महिलांमध्ये पी. व्ही सिंधूनंही आयर्लंडच्या सोफिया नोबेलचा 21-7, 21-11 असा पराभव करून दुसरी फेरी गाठली. महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं स्पेनच्या जोडीचा पराभव केला. पुरुष दुहेरीत हरिहरन अम्साकरुणन आणि एम. आर अर्जून यांनीही दुसरी फेरी गाठली.

**पुरुष हॉकी**

नेदरलँडस् इथं सुरू असलेल्या पुरूषांच्या एफआयएच हॉकी विश्वकरंडक स्पर्धेत काल भारताला इंग्लंडकडून 2-4 असा पराभव पत्करावा लागला. उद्या भारताचा सामना पाकिस्तान संघाशी होणार आहे. दुसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी भारताला हा सामन्यात विजय अथवा बरोबरी आवश्यक आहे. पराभव झाल्यास भारत स्पर्धेतून बाहेर पडेल.

**महिला हॉकी**

एफआयएच महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेत आज नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीन इथं होणाऱ्या स्पर्धेतील 'ड' गटाच्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. सध्या इंग्लंडचा संघ-'ड' गटात आघाडीवर आहे, तर भारत आणि चीन समान गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत.

**मच्छिमार**

आंध्र प्रदेशातल्या मच्छिमारांना घेऊन जाणारी एक बोट समुद्रात बेपत्ता झाली आहे. हे मच्छिमार 3 ऑगस्टला मासेमारीसाठी निघाले होते आणि दहा दिवसांच्या आत परतणं अपेक्षित होतं. या बेपत्ता मच्छिमारांचा शोध घेण्यासाठी सागरी पोलीस आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी शोध मोहीम सुरू केली आहे.

**हिमाचल प्रदेश**

हिमाचल प्रदेशात काल झालेल्या मुसळधार पावसामुळं 87 रस्ते बंद पडले असून चंबा जिल्ह्यात एक लोखंडी पूल पुरामुळे वाहून गेला. मुसळधार पावसामुळे हिमाचल प्रदेशात जनजीवन विस्कळीत झालं असून आत्तापर्यंत 80 जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान विभागानं आजही काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस पडण्याचा इशारा दिला आहे.

**उत्तराखंड-पाऊस**

उत्तराखंड राज्यातील गढवाल क्षेत्रासाठीही हवामान विभागानं मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पाऊस आणि भुस्खलनामुळे राज्यातल्या 97 रस्त्यांवरील वाहतूक बंद आहे. नागरिक आणि पर्यटकांनी हवामानाच्या अंदाजानुसार प्रवासाचं नियोजन करावं असं आवाहन राज्य प्रशासनानं केलं आहे.

**हवामान**

हवामान विभागानं आज झारखंड तसंच, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, ओडिशा आणि उत्तर प्रदेशमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.